लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी १६९ अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी ऑनलाईन अर्जाची प्रत (हार्ड कॉपी) सादर करण्याची मुदत शुक्रवारी संपली. या मुदतीत कुलगुरु शोध समितीकडे ऑनलाईन आणि ऑफलाईन असे एकूण १६९ अर्ज सादर झाले आहेत. त्यांच्या छाननीची प्रक्रिया पुढील किमान १५ दिवस चालणार आहे. त्रिसदस्यीय शोध समितीकडून कुलगुरु निवडीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या समितीकडे दि. २ जुलैपर्यंत विद्यापीठ कार्यक्षेत्र आणि मुंबई, पुणे येथील २१ जणांनी ऑनलाईन अर्ज केले आहेत. या अर्जांची प्रत टपालाने जमा करण्याची मुदत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या समितीने दि. १० जुलैपर्यंत दिली होती. या मुदतीत समितीकडे ऑफलाईन आणि ऑनलाईन पद्धतीने एकूण १६९ अर्ज जमा झाले आहेत. त्यांच्या छाननीची प्रक्रिया किमान १५ दिवस चालणार आहे. त्यानंतर पात्र आणि अपात्र उमेदवारांच्या नावांची यादी तयार होणार आहे.

> “ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने जमा झालेल्या अर्जांची शोध समितीच्या मार्गदर्शनानुसार छाननी केली जाणार आहे.
>
> – आर. के. जैन, संपर्क अधिकारी

आयुर्वेदिक रुग्णालय

इन्द्रीय समस्या नाराज का ??
कीमत-300/-700/-1000/-रु.फक्त
आणि 16 GB मेमरी कार्ड फ्री
08582968918 / 08585827722

# कुलगुरू पदासाठी १६९ अर्ज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी पोस्टाने अर्ज पाठवण्याचा आज शेवटचा दिवस होता. या पदासाठी देशभरातून ऑनलाइन आणि ऑफलाईन, असे १६९ अर्ज आले, अशी माहिती सूत्रांनी दिली. माजी कुलगुरू देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर शोध समितीची नियुक्ती करण्यात आली. २ जुलैपर्यंत ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत होती, तर पोस्टाने अर्ज पाठविण्याची अंतिम तारीख शुक्रवारी (ता. १०) होती. आज ऑनलाईन आणि ऑफलाईन असे मिळून १६९ अर्ज प्राप्त झाले. पुढील पंधरा दिवसांत अर्जांची छाननी होऊन त्यानंतर मुलाखतीची प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# डॉ. घाळी कॉलेजच्या १८ मुलींना शिवाजी विद्यापीठाची शिष्यवृत्ती

**गडहिंग्लज :** डॉ. घाळी कॉलेजच्या बी. ए. भाग एक च्या रोहीणी परसगोंड, मयुरी तोडकर, राणी सावेकर, कल्पना भाट, रेश्मा कुंभार, अनुसया सुतार, अश्वीनी वाळरे व संध्याराणी संभोजी तसेच बी. कॉम भाग एक च्या अक्षता परीट, निकीता वडराळे, ज्योती माने, अंकीता पाटील, कोमल सोलापूरे, गीता बागे, बी. एस्सी भाग दोनच्या अश्वीनी पाटोळे, स्वाती माने या सर्वांना प्रत्येकी पाच हजार रूपयाची शिवाजी विद्यापीठाची गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाली आहे. तसेच एम. ए. ची विद्यार्थीनी सुजाता कुरणे व बी. कॉम भाग तीन ची प्रियंका कांबळे यांना प्रत्येकी दहा हजाराची शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यांना प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील, विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख डॉ. नागेश मासाळ व या विभागाचे सदस्य, सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी, कार्याध्यक्ष डॉ. सतिश घाळी, उपाध्यक्ष अरविंद कितुरकर, सचिव ॲड. बी. जी. भोसकी, सहसचिव प्रा. गजेंद्र बंदी व सर्व संचालक यांचे प्रोत्साहन लाभले.